सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

**आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय**
राज्य उत्पादन शुल्क भवन, महानगरपालिका सभागृह मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१.
E-mail Id : excise.estmaharashtra@gmail.com

वाचा : १) या कार्यालयाचे जाहिरात क्र.इएसटी ११२२/पदभरती २०२२/३२/२अ-३ दि.१७.११.२०२३.
२) या कार्यालयाचे सम क्रमांकाचे दि.२१.०३.२०२५ रोजीचे नियुक्ती आदेश.
३) या कार्यालयाचे सम क्रमांकाचे दि.०६.०५.२०२५ रोजीचे आदेश.

क्रमांक — इएसटी / जवान भरती २०२२/३२/२-अ-३ मुंबई, दिनांक ३० मे, २०२५.

## आदेश

सन २०२२-२३ मधील जाहिरातीनुसार राज्य उत्पादन शुल्क विभागात जवान आणि जवान-नि-सरकसेवा भरती प्रक्रिया मे. टी. सी. एस. मुंबई यांचेमार्फत राबविण्यात आली होती. सदर भरती प्रक्रियेमध्ये प्रतिक्षायादीतून निवड झालेल्या उमेदवारांना उक्त वाचा येथील आदेश दि.२१.०३.२०२५ अन्वये नियुक्ती आदेश निर्गमित केले होते. सदर आदेशातील अट क्र.२ नुसार नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर विहीत मुदतीत (३० दिवसांच्या आत) नियुक्तीच्या ठिकाणी रुजु न झालेल्या उमेदवारांना उक्त वाचामधील दि.०६.०५.२०२५ रोजीच्या आदेशान्वये दि.१५.०५.२०२५ पर्यंत रुजु होण्यास प्रथम मुदतवाढ देण्यात आली होती.

परंतु राज्य शासनाच्या अन्य विभागामध्ये कार्यरत असल्याने खालील उमेदवारांनी या विभागात निवड झालेल्या ठिकाणी हजर होण्यास मुदतवाढ मिळण्याची विनंती केली आहे.

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | पदनाम | नियुक्तीचे कार्यालय |
|---|---|---|---|
| १. | श्री. बाजीराव संभाजी पाटील | जवान | अधीक्षक, राउशु, सांगली |
| २. | श्री. योगेश पोपटराव राऊत | ज.नि.वा. | अधीक्षक, राउशु, मुंबई उपनगर |

तरी वरील सर्व उमेदवारास या विभागात त्यांना दि.२१.०३.२०२५4 रोजीच्या आदेशानुसार नियुक्ती दिलेल्या ठिकाणी हजर होण्यास **दि.०३.०६.२०२५ पर्यंत** मुदतवाढ देण्यात येत आहे. सदरची अंतिम संधी असून विहीत मुदतीत नेमणुकीच्या ठिकाणी रुजु / हजर न होणाऱ्या उमेदवारांचे नियुक्ती आदेश आपोआप रद्द होतील. तसेच ते या विभागात झालेल्या नेमणुकीचा हक्क गमावुन बसतील. पुढे त्यांचा कोणत्याही परिस्थितीत पुन्हा पुनर्नियुक्तीसाठी विचार करण्यात येणार नाही, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.
मा. आयुक्तांचा मान्यतेने.

(सुनील चव्हाण)
सह-आयुक्त (प्रशासन),
राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,
सर्व संबंधित उमेदवार.

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी.
१. विभागीय उप-आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, कोल्हापूर व ठाणे
२. अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, सांगली व मुंबई उपनगर.

D:\Raam\Recruitment\Constable-2.docx